Literacy for a Billion

Movie: Chimani Pakhare
Year: 2003

Song: Kashi Kalachi Chahul
Lyricist:

कशी काळाची चाहूल आली
बाग सुखाची करपून गेली
कशी काळाची चाहूल आली
बाग सुखाची करपून गेली
कसं विपरीत झालं सारं
होता सोन्याचा संसार
माझ्या राणीचा दरबार
होता सोन्याचा संसार
भोळ्या राणीचा दरबार

तुझ्याविना हा जन्म सुना
एकाकीपण येई गं
प्रेमदेवता माझी तू
अपार शक्ती देई गं
जरी कोसळले आभाळ
तरी करीन मी सांभाळ
जरी कोसळले आभाळ
तरी करीन मी सांभाळ
घे पुन्हा नवा अवतार
होता सोन्याचा संसार
माझ्या राणीचा दरबार
होता सोन्याचा संसार
भोळ्या राणीचा दरबार
चिमण पिलांनो कुशीत या
करीन तुम्हावर माया
काळजातल्या ममतेची
धरीन तुम्हावर छाया
काय मागावं मी देवा
घर सुखात माझं ठेवा
काय मागावं मी देवा
घर सुखात माझं ठेवा
करी जन्माचा उद्धार
होता सोन्याचा संसार
माझ्या राणीचा दरबार
होता सोन्याचा संसार
भोळ्या राणीचा दरबार
कशी काळाची चाहूल आली
बाग सुखाची करपून गेली
कसं विपरीत झालं सारं
होता सोन्याचा संसार
माझ्या राणीचा दरबार
होता सोन्याचा संसार
भोळ्या राणीचा दरबार

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*